## आदिवासी घरकुल योजनेची शहरात जलदगतीने कारवाई करा

### खासदार डॉ. हेमंत सवरा यांची मागणी




**वसई, दि. २७ : प्रतिनिधी**

शहरी शबरी आदिवासी विकास घरकुल योजनेच्या अंमलबजावणीसाठी पालघर जिल्ह्यातील शहरी भागांमध्ये जलद कारवाईची करण्यात यावी, अशी मागणी खासदार डॉ. हेमंत विष्णु सवरा यांचे आदिवासी विकासमंत्री अशोक ऊईके यांच्याकडे केली आहे. पालघर जिल्ह्यातील नागरी क्षेत्रातील आदिवासी नागरिकांसाठी सुरक्षित व सन्मानजनक निवारा उपलब्ध व्हावा, या हेतूने "शहरी शबरी आदिवासी विकास घरकुल योजना" राज्यात राबवण्यात येत आहे. १० जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार, ग्रामीण भागातील "शबरी घरकुल योजने"च्या धर्तीवर ही योजना शहरी भागांतही अंमलात आणली जाणार आहे. वाडा नगरपंचायत क्षेत्रातील सुमारे ३०० पात्र लाभार्थ्यांचे अर्ज शबरी आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार येथे सादर करण्यात आले आहेत. मात्र, योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील इष्टांक (Target Index) अद्याप मंजूर न झाल्याने प्रत्यक्ष अंमलबजावणीत विलंब होत आहे. या मुद्द्यावर खासदार डॉ. हेमंत विष्णु सवरा यांनी आदिवासी विकासमंत्री प्रा. डॉ. अशोकजी ऊईके, मंत्री यांच्याकडे केली आहे. पालघर जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रांमध्ये तातडीने इष्टांक मंजूर करून योजनेच्या दुसऱ्या टप्प्याची अंमलबजावणी सुरू करण्यात यावी. या योजनेमुळे हजारो आदिवासी कुटुंबांना सन्मानाने जगण्याचे हक्काचे घर मिळेल. हा उपक्रम सामाजिक न्याय, समावेशक विकास आणि "घर हर गरीब का हक्क" या तत्त्वाशी सुसंगत आहे, अशी विनंती खासदार सवरा यांनी केली आहे.

# भिवंडी-वाडा-मनोर आणि कामण-चिंचोटी रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात 12 तासांचा लढा

## श्रमजीवी संघटनेचे एकाचवेळी नऊ ठिकाणी रास्ता रोको

**वसई, दि. २७ : प्रतिनिधी**

भिवंडी-वाडा-मनोर आणि कामण-चिंचोटी-अंजूर फाटा या रस्त्यांच्या दयनीय अवस्थेविरोधात श्रमजीवी संघटनेने २६ जून २०२५ सकाळी ११:३० वाजल्यापासून अंबाडी, कुडूस, डाकिवली फाटा, शिरीष पाडा, खंडेश्वरी नाका, नंदीठणे, कवाड, मालोडी आणि कामण या नऊ ठिकाणी एकाच वेळी रास्ता रोको आंदोलन पुकारले. तब्बल १२ तास चाललेले हे आंदोलन ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला भेडसावणाऱ्या रस्त्यांच्या समस्येवर प्रकाश टाकणारे ऐतिहासिक ठरले आहे. श्रमजीवी संघटनेच्या सभासदांसमवेत सामान्य नागरिक व्यापारी विद्यार्थीसुद्धा या आंदोलनात सहनही झालेले दिसले.

भिवंडी-वाडा-मनोर आणि चिंचोटी-कामण-अंजूर फाटा-भिवंडी हे दोन मार्ग अतिशय महत्वाचे मार्ग मानले जातात. पालघर, ठाणे, नाशिक, मुंबईसह गुजरात आणि दिल्लीला जोडले जातात. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून यादोन्ही मार्गावर मोठ्ठाले खड्डे पडल्याने दोन्ही महामार्गाची दैनवस्था झाली आहे. पावसाळ्यात तर खडड्यांमध्ये पाणी साचून अनेक अपघात होत आहेत. भिवंडी-वाडा-मनोर महामार्गावर तर गेल्या तीन वर्षांत अपघाताने ८१ जणांचे बळी घेतले आहेत. त्यामुळे त्रस्त झालेल्या वाहनचालक, गावकरी यांची ही जीवघेणी समस्या मार्गी लावण्यासाठी श्रमजीवी संघटनेने दोन्ही महामार्गावर विविध नऊ ठिकाणी



रास्ता रोको आंदोलन केले. विशेष म्हणजे हे आंदोलन गुरुवारी रात्री उशिरापर्यंत, तब्बल बारा तास सुरु होते. चिंचोटी येथील आंदोलनाला आमदार स्नेहा दुबे यांनी भेट रस्ता दुरुस्ती मागणी लावून धरली.

या रस्त्यांच्या दुरवस्थेचा मुद्दा यापूर्वी १८ डिसेंबर २०२३ रोजी विधानपरिषद सभागृहात आमदार प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केला होता. त्यावेळी तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी जिजाऊ कन्स्ट्रक्शन कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची घोषणा केली होती. श्रमजीवी संघटनेने या आंदोलनादरम्यान लोकशाहीच्या पवित्र सभागृहात दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्याची जोरदार मागणी केली. २०१९ पासून या रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी कोट्यवधी रुपये मंजूर होऊनही खड्डे न भरल्याने अनेक अपघात घडले. याबाबत अधीक्षक अभियंत्यांनी ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव शासनाला पाठवला असून, तो पुन्हा पाठवण्याचे आश्वासन दिले आहे. २०२२ ते २०२५ या कालावधीत या महामार्गावरील खराब रस्त्यांमुळे तब्बल ८१ जणांचा मृत्यू झाला आहे. या मृत्यूंना जबाबदार ठेकेदारांवर कारवाईची मागणी संघटनेने लावून धरली आहे.

श्रमजीवी संघटनेने आक्रमक पवित्रा घेत रस्त्यांच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी गुरुवारी सकाळपासूनच नऊ ठिकाणा रास्ता रोको आंदोनल करून वाहतूक बंद पाडली होती. संध्याकाळी ४:३० वाजल्यापासून संघटनेचे शिष्टमंडळ आणि ठाणे व पालघर जिल्ह्यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, कार्यकारी अभियंता सचिन पाटील, वाडा उपविभागीय अधिकारी संदीप चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झाल्टे पाटील, जव्हार उपविभागीय अधिकारी गणपत पिंगळे, भिवंडी तहसीलदार अभिजीत खोले, वाडा तहसीलदार भाऊसाहेब अंधारे आणि ठाणे ग्रामीण गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे यांच्यासह महसूल प्रशासनाच्या अधिकाऱ्यांशी सात तास जोरदार चर्चा झाली. संघटनेने अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे यांना रस्त्यावर आणून जनतेच्या प्रश्नांना उत्तरे देण्यास भाग पाडले.

संघटनेचे राज्य उपाध्यक्ष दत्तात्रय कोलेकर, सरचिटणीस बाळाराम भाऊ, सरचिटणीस विजय भाऊ जाधव, जिल्हाध्यक्ष अशोक सापटे, पालघर जिल्हा अध्यक्ष सुरेश रेंजड, प्रवक्ते प्रमोद पवार, संघटक सचिव सिता घाटाळ, सुनील लोणे आणि पूजा माळी यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले. आंदोलनाची दखल बांधकाम मंत्री आणि मुख्यमंत्री कार्यालयाने घेतली असून, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिंगारे यांच्यावर याप्रकरणाची चौकशी करून फौजदारी गुन्हे दाखल करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. नादुरुस्त रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी कृती आराखडा तयार करून उद्यापासून त्याची अंमलबजावणी सुरू होईल, असे लेखी आश्वासन देण्यात आले. यासह इतर मागण्यांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर रात्री ११:३० वाजता हे आंदोलन संपवण्यात आले.

# डिजिटल अरेस्टची भीती घालून सव्वा कोटींचा गंडा

## वर्तक महाविद्यालयाच्या माजी प्राचार्याची फसवणूक

**वसई, दि. २७ : प्रतिनिधी**

सायबर भामट्यांचा डिजिटल अरेस्टची भिती दाखवून लोकांना लुटण्याचा प्रकार सरास सुरु आहे. असाच एक प्रकार वसईमध्ये उघडकीस आला आहे. वसईतील वर्तक महाविद्यालयाचे माजी प्राचार्य प्रा. संतोष शेंडे यांना सायबर भामट्यांनी डिजिटल अरेस्टच्या नावाखाली १ कोटी ३५ लाख रुपयांचा गंडा घालण्यात आला आहे. शेंडे यांच्यावर गुन्हा दाखल असून अटक टाळण्यासाठी तडजोड म्हणून ही रक्कम उकळण्यात आली आहे.

फिर्यादी प्रा. संतोष शेडे (६३) हे वसईत राहतात. ते वर्तक महाविद्यालयातून प्राचार्य पदावरून निवृत्त झाले होते. १९ मे २०२५ रोजी त्यांना एका अनोळखी क्रमांकावरून फोन आला. कुलाबा पोलीस ठाण्यातील वरिष्ठ अधिकारी बोलत असल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर व्हिडियो कॉल करण्यात आला. समोर पोलीस ठाण्याचा देखावा उभार करण्यात आला होता. शेंडे यांच्या आधार कार्डाचा वापर करून कॅनरा बॅंकेत खाते उघडण्यात आले आहे.

या खात्यात काळा पैशांचा व्यवहार होत असल्याचे सांगितले. शेंडे यांच्याविरोधात टेलिकॉम रेग्युलेटरी ॲथॉरटी ऑफ इंडिया (ट्राय) ने गुन्हा दाखल केला असून अटक वॉरंट काढण्यात आल्याचे सांगितले. याप्रकरणात अटक करण्यासाठी त्यांना कुलाबा पोलीस ठाण्यात बोलवण्यात आले. जर अटक टाळायची असेल तर तडजोड करावी लागेल, असे सांगितले. यानंतर संदीप राव, नीरज कुमार, विजय खन्ना नावाच्या व्यक्तीं पोलीस अधिकारी बनून प्रा शेंडे यांच्या संपर्कात होते. त्यांनी शेंडे यांच्याकडून अटक टाळण्यासााठी १९ मे ते १३ जून २०२५ या कालावधीत तब्बल १ कोटी ३५ लाख ६९ हजार रुपये उकळले.अखेर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शेंडे यांनी वसई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीनुसार वसई पोलीस ठाण्यात तीन अज्ञात व्यक्तींविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१९ (२), ३१८ (४) ३ (५) अन्वये फसवणूक तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम ६६ (सी) ६६ (डी) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**काय आहे डिजिटल अरेस्ट?**

डिजिटल अरेस्ट हा फसवणुकीचा नवीन प्रकार आहे. यामध्ये भामटे व्हॉटसअपवर व्हिडियो कॉल करतात. समोर नकली पोलीस ठाणी दाखवतात. कुठल्यातरी घोटाळ्याची चौकशी करत असल्याचे भासवतात आणि डिजिटल अरेस्ट केल्याचे सांगतात. तुमच्या खात्यांवर, व्यहारांवर नजर असून चौकशी असल्याचे सांगतात. अटक टाळण्यासाठी तडजोडीच्या नावाखाली पैसे उकळतात. परंतु प्रत्यक्षात डिजिटल अरेस्ट ही संकल्पनाच अस्तित्वात नाही.

# रास्ता रोकोमुळे बससेवा विस्कळीत

## बाहेरच्या आगारातील बसेसचा वाड्यातच मुक्काम

**वाडा, दि. २७ : प्रतिनिधी**

वाडा तालुक्यात श्रमजीवी संघटनेच्या माध्यमातून गुरुवार(दि.२६) रोजी सकाळी अकरा वाजल्यापासून वाडा- भिवंडी महामार्गावर सुरू झालेले रस्ता रोको आंदोलन रात्री उशिरापर्यंत सुरूच राहिल्याने प्रवाशांसह बाहेरील आगारांच्या बसेसच्या वाहक, चालकांची गैरसोय होऊन त्यांना वाडा बस स्थानकात बस लावून मुक्काम ठोकावा लागला.

रास्ता रोको आंदोलन मनोर-वाडा -भिवंडी महामार्गावरील वाड्यातील खंडेश्वरी नाका, शिरीष पाडा, कुडूस नाका, डाकीवली फाटा तालुक्यात या चार ठिकाणी करण्यात आले होते. श्रमजीवी संघटनेच्या वतीने सुरू झालेले रस्ता रोको आंदोलन रात्री उशिरापर्यंत सुरूच राहिल्याने बस, खाजगी वाहने यांची वाहतूक ठप्प होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा



लागल्या होत्या. त्यात प्रवाशांचीही गैरसोय झाली. जव्हार, पालघर, बोईसर, भिवंडी या आगरातील बस वाडा -भिवंडी महामार्गावरच अडकल्याने चालक वाहकानी या सर्व बस वाडा बस स्थानकात लावून त्यांनी आपला मुक्काम बस स्थानकातच ठोकल.

दरम्यान, या बाहेरील आगरांच्या बसच्या चालक वाहकांची गैरसोय झाली असल्याने वाड्यातील काही सामाजिक कार्यकर्त्यांनी या कर्मचाऱ्यांची जाऊन विचारपूस केली. काही मदत लागल्यास आमच्याशी संपर्क करा असे सांगितल्याने याकर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

## मीरारोडमधील हुक्का पार्लरवर कारवाई

**भाईंदर, दि. २७ : प्रतिनिधी**

मीरारोड येथील भक्ती वेदांत हॉस्पीटलसमोर दी कंटेनर किचन या हॉटेलमध्ये सुरु असलेल्या हुक्का पार्लरवर काशिमीरा पोलिसांना छापा मारून कारवाई केली. याठिकाणी खुलेआम हक्कापार्लर सुरु असल्याची माहिती मिळाल्यावरून पोलिसांनी २५ जूनच्या पहाटे छापा मारला होता. त्यावेळी हॉटेलमध्ये नऊ गिऱ्हाईकांना हुक्का दिला जात असल्याचे आढळून आले. यावेळी पोलिसांनी हुक्क्यासाठी लागणारे साहित्य जप्त केले आहे. तसेच मॅनेजर, कॅशियर, वेटर, ग्राहकांसह २३ जणांविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सीबीआय ऑफिसर असल्याची बतावणी करून 64 लाखांना गंडा

**वसई, दि. २७ : प्रतिनिधी**

सीबीआय ऑफीसर असल्याची बतावणी करून सयुंक्त नगर येथील राहुल अपार्टमेंट बिल्डिंग नंबर ३ मधील दिनानाथ मिश्रा (वय ५८) यांची ७ ते २९ मार्चदरम्यान ६४ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. आरोपी रंजू कुमारी हिने फोन करून मिश्रा यांच्या आधारकार्डवरून घेतलेल्या सीमवरून लोकांची फसवणूक झाल्याचे सांगत तिलकनगर पोलिस ठाणे येथे याप्रकरणी गुन्हा दाखल असल्याचे रंजू कुमारी नावाच्या महिलेने मिश्रा यांना सांगितले. त्यानंतर मिश्रा यांच्या मोबाइलवर फोन करून संदीप राव आणि प्रदीप सांवत यांनी युनिफॉर्मवर व्हिडीओ कॉल करून सीबीआय ऑफीसर असल्याची बतावणी केली. दिनानाथ मिश्रा, नरेश गोयल यांनी मनी लॉंड्रिंग केली असल्याची धमकी देऊन त्यांना अटक करणार असल्याचे सांगत याबाबत मोबाइल व्हॉट्सॲपवर नोटिसादेखील पाठवल्या. यानंतर मिश्रा यांच्याकडून ४४ लाख रुपये रक्कम आरटीजीएसद्वारे घेण्यात आली. मिश्रा यांच्याकडून पैसे उकळल्यानंतर ऑनलाइन कोर्टासमोर हजर करून ५० लाखांच्या बेलबॉंडवर सोडत असल्याची आणखी एक बतावणी करून मिश्रा यांच्याकडून पुन्हा २० लाख रुपये घेतले. चारही आरोपींनी त्यांची एकूण ६४ लाखांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी तक्रार दाखल होताच आचोळे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# खाडीतील बेकायदा मातीचा भराव काढण्यास सुरुवात

## मुंबई हायकोर्टाच्या निर्देशानुसार कारवाई; पावसामुळे अडथळा, प्रशासनासमोर आव्हान

**डहाणू, दि. २७ : प्रतिनिधी**

डहाणू शहरातील चंद्रसागर खाडी परिसरात सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करत अवैधरित्या मातीचा भराव करण्यात आला असून, यामुळे पर्यावरणासह स्थानिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यासंदर्भात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाने ९ जून रोजी निकाल देत सहा आठवड्यांत परिस्थिती पूर्ववत करण्याचे आदेश डहाणू प्रशासनाला दिले आहेत. या पार्श्वभूमीवर माती भराव हटवण्याचे काम सुरू करण्यात आले असले तरी, पावसामुळे अडथळे निर्माण होत आहेत.

चंद्रसागर खाडी क्षेत्र डहाणू महसूल विभागाच्या डहाणू व मल्याण मंडळांत येते. येथील काही जमीन मालकांनी खाडी भागात बेकायदेशीरपणे माती टाकून मोठे बांध उभारले असल्याने कांदळवनाला नुकसान पोहोचवले आहे. यामुळे पर्यावरणावर गंभीर परिणाम होऊ लागले. हे लक्षात घेऊन



सामाजिक कार्यकर्त्या संगीता मंगळया कडू यांनी २०२३ साली मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने ३ एप्रिल रोजी याचिका निकाली काढत जिल्हाधिकाऱ्यांना बेकायदेशीर भराव व खारफुटीचे नुकसान करणाऱ्यांविरोधात कारवाईचे निर्देश दिले. त्यानंतर ९ जूनच्या आदेशात सहा आठवड्यांत खाडी पूर्ववत करण्याचे सांगण्यात आले. त्या अनुषंगाने १४० व १८३ क्रमांकाच्या शासकीय जमिनीवरील भराव हटवण्याचे काम मंडळ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सुरू करण्यात आले आहे. मात्र, पावसाला सुरुवात झाल्याने काम थांबवावे लागल्याची माहिती महसूल विभागाने दिली. खाडीतील माती भरावामुळे शहरातील पाणी निचरा अडवला जात असून, यामुळे पावसाळ्यात पुराचे पाणी लोकवस्तीत शिरत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. तसेच काही शेतीक्षेत्रांचे नुकसान झाल्याचेही समोर आले आहे. नागरिकांनी वेळोवेळी भराव हटवण्याची मागणी केली होती. मात्र, स्थानिक प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

संगीता कडू यांच्या सामाजिक व पर्यावरणपूरक लढ्यामुळे आता या मुद्द्याकडे गांभीर्याने पाहिले जात असून, त्यांच्या प्रयत्नांचे सर्वत्र कौतुक होत आहे. खाडी क्षेत्रातील इतर अवैध प्रकारही उघडकीस येण्याची शक्यता असून, यावर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे. प्रशासनाला आता सहा आठवड्यात न्यायालयीन आदेशाचे पालन करून अहवाल सादर करायचा आहे. मात्र, पावसामुळे काम रखडल्याने हे आव्हान अधिक कठीण ठरण्याची शक्यता आहे.

# 108 रुग्णवाहिका सेवा 1 जुलैपासून ठप्प होण्याची शक्यता

## प्रलंबित मागण्यासाठी चालकांचा सरकारला इशारा

**डहाणू, दि. २७ : प्रतिनिधी**

राज्यभरात आपत्कालीन वैद्यकीय सेवांचा आधार असलेली १०८ रुग्णवाहिका सेवा बंद होण्याच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचली आहे. या सेवेतील चालकांनी आपल्या अनेक वर्षांपासूनच्या प्रलंबित मागण्यांकडे शासन आणि सेवा पुरवठादार कंपन्यांकडून सातत्याने होत असलेल्या दुर्लक्षाचा तीव्र निषेध नोंदवत १ जुलै २०२५ पासून पूर्ण कामबंद आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थेला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

या आंदोलनाचे नेतृत्व सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन (सिटू) करत असून, ३० जूनपर्यंत सकारात्मक निर्णय न झाल्यास १०८ सेवा पूर्णपणे ठप्प करण्याचा इशारा संघटनेकडून देण्यात आला आहे. राज्यभरात दररोज हजारो रुग्ण या सेवेचा लाभ घेत असतात. अपघात, हृदयविकार, प्रसूतीसेवा, तसेच कोविडसारख्या साथींच्याकाळातही या ॲम्बुलन्सने महत्वाची भूमिका बजावली होती. त्यामुळे या सेवेत व्यत्यय आल्यास ग्रामीण तसेच दुर्गम भागांतील आरोग्यसेवा कोलमडण्याचा धोका निर्माण झाला आहे. १०८ सेवा ही सार्वजनिक-खाजगी भागीदारीत चालणारी अत्यावश्यक सेवा आहे. मात्र, या सेवेत कार्यरत चालक व तांत्रिक कर्मचाऱ्यांना अत्यल्प वेतन, संरक्षक उपायांचा अभाव, तांत्रिकदृष्ट्या अयोग्य वाहनं, अतिरिक्त कामाचा भार, आणि न मिळणारे ओव्हरटाइम वेतन यांसारख्या गंभीर समस्यांना रोज सामोरे जावे लागत आहे.

१३ मे २०२५ रोजी मुंबईतील आझाद मैदानावर झालेल्या आंदोलनात सिटूने हे मुद्दे लावून धरले होते. त्यावेळी आरोग्य सेवा संचालनालयाने सिटू प्रतिनिधींना न्याय देण्याचे लेखी आश्वासन दिले होते. तसेच सेवा पुरवठादारांना याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले होते. परंतु, त्यानंतरही कोणतीही ठोस कृती न झाल्याने चालकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. "राज्यभरात १०८ सेवेतील सुमारे २ हजार २०० चालक दिवस-रात्र सेवा देत आहेत. पण, त्यांच्या मुलभूत गरजांकडे सरकार आणि कंपन्यांकडून केवळ दुर्लक्षच झाले आहे. आम्ही आता आंदोलनाशिवाय इतर पर्याय उरलेला नाही. आमच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय कामावर परतणार नसल्याचे संघटनेने सांगितले आहे.

ही सेवा बंद पडल्यास राज्यातील आरोग्य यंत्रणांवर ताण येणार हे निश्चित आहे. विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागात, जिथे खाजगी वैद्यकीय पर्याय फारसे उपलब्ध नाहीत, तिथे या सेवेला पर्यायच उरत नाही. त्यामुळे या आंदोलनाचे गांभीर्य लक्षात घेता राज्य शासन आणि आरोग्य विभागाने तातडीने लक्ष घालून सर्व संबंधित पक्षांची संयुक्त बैठक घेण्याची आणि चालकांच्या न्याय्य मागण्या मान्य करण्याची मागणी होत आहे.

सर्वसामान्य नागरिकांचे प्राण वाचवणारी ही सेवा केवळ सरकारची योजना नाही, तर ती एक सामाजिक कर्तव्य आहे. ही जबाबदारी पार पाडताना चालकांनी प्रामाणिकपणे सेवा दिली आहे. मात्र, त्यांच्या निष्ठेला उत्तर देण्याऐवजी त्यांची अडचण दुर्लक्षित केली जाणे अत्यंत दुर्दैवी आहे. नागरिकांना अपेक्षा आहे की, शासन याकडे गांभीर्याने लक्ष देईल व वेळेवर उपाययोजना करून ही सेवा चालू ठेवेल.

## देवकुंडी नदीत बुडून तरुणाचा मृत्यू

**वसई, दि. २७ : प्रतिनिधी**

पावसात पर्यटकांचे आकर्षण असलेल्या वसई पूर्वेकडील तुंगारेश्वर पर्वतावरील धबधबे आणि नदीत पर्यटक सहलीसाठी येऊ लागले आहेत. येथील ठिकाणे अतिशय धोकादायक असून दरवर्षी काही पर्यटकांचा बुडून मृत्यू होत असतो. पोलीस प्रशासन याठिकाणी पर्यटकांना नेहमीच बंदी घातल असते. असे असतानाही अति उत्साही पर्यटक गर्दी करताना दिसतातच. अशाच एका पर्यटकाचा २५ जूनला पोमण गावच्या हद्दीतील देवकुंडी नदीत बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. प्रणित प्रवीण जुवळे (वय १९ वर्षे, रा. चिंतामण बिल्डींग, देवीपाडा, बोरीवली पूर्व) असे त्याचे नाव आहे. प्रणित आपल्या मित्रांसंह कोमण परिसरात फिरायला आला होता. त्यावेळी देवकुंडी नदीत पोहण्यासाठी उतरलेल्या प्रणितला पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने बुडून त्याचा मृत्यू झाला आहे. याघटनेनंतर पोलिसांनी कामण, पोमणमधील नदी, चिंचोटी, तुंगारेश्वर परिसरातील धबधब्यांमध्ये येण्यास पर्यटकांना बंदी घातली आहे.

## निवीदा सुचना क्र-1

पालघर जिल्हयातील खालील कामाकरीता महाराष्ट्र शासनाच्या तसेच शासकीय/निमशासकीय संस्थेकडील नोदणीकृत ठेकेदाराकडुन खाली नमुद केल्यानुसार मोहरबंद दर e-Tendering पध्दतीने मागविण्यात येत आहेत. सदर कामाचे कोरे निवीदा फॉर्म दि. ०१/०७/२०२५ ते. २५/०७/२०२५ रोजी ३.०० वाजेपर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी पालघर यांच्या कार्यालयात व E-Tendering संकेत स्थळ व https://mahatenders.gov.in येथे उपलब्ध होतील. निवीदाधारकाने निवीदा फॉर्म फि व इसारा रक्कम ऑन लाईन रिसिप्ट सिस्टीमद्वारे भरणा करावी, अन्यथा निवीदा ग्राह्य समजण्यात येणार नाही.

सदर कामी मागविलेल्या मोहरबंद निविदा दिनांक २५/०७/२०२५ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील. कोणतेही कारण न देता ऑनलाईन निवीदा स्विकारणे अथवा सर्वच निवीदा नाकारणे याबाबतचा अंतिम अधिकार तालुका क्रीडा संकुल समिती वाडा यांनी राखुन ठेवलेला आहे.

| क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च | इसारा रक्कम | ठेकेदाराचा वर्ग | निवदिाचा प्रकार | निवदि फॉर्म फि | मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाडा ता वाडा, जिल्हा पालघर येथील तालुका क्रीडा संकुल वाडाचे प्रस्तावित (सिव्हील + इलक्ट्रिकल ) बांधकाम करणे. | रु २,२९,११.३५५/- | रु १,५०,०००/- | पात्र आणि असक्षमक कंत्राटदार | बी-१ | रू २,३६०/- | १२ महिने |

ठिकाण- वाडा
दिनांक- २४/०६/२०२५

आपला विश्वासू
सही/-
सुहास व्हनमाने
जिल्हा क्रीडा अधिकारी, पालघर

डी.जी.आय.पी.आर.आरओसी २०२५-२६/क्र-५/C१४००

# वीज खरेदी खर्चातील 66 हजार कोटींच्या बचतीमुळे दरात कपात

## भविष्यकाळात काळात वीजदरात आणखी घट-महावितरण अध्यक्ष लोकेश चंद्र

**मुंबई, दि. २७ : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने गेल्या अडीच वर्षात राज्याच्या वीज पुरवठ्यासाठी केलेल्या नियोजनामुळे आगामी पाच वर्षात कंपनीची वीज खरेदी खर्चात ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने त्याचा लाभ वीज ग्राहकांना देऊन आगामी पाच वर्षांसाठी वीजदरात कपात करता आली. महावितरणने नवीकरणीय ऊर्जेवर भर दिला असून त्यांचे वीजदर कायम राहणार असल्याने पाच वर्षानंतर वीजदरात आणखी घट होईल, असे प्रतिपादन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी गुरुवारी मुंबईत केले. ते पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी महावितरणचे संचालक (संचलन) सचीन तालेवार, संचालक (वाणिज्य) योगेश गडकरी, संचालक (वित्त) अनुदीप दिघे व संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार उपस्थित होते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने बुधवारी महावितरणच्या वीजदराबाबत आदेश जारी केला व महावितरणचा वीजदर कमी करण्याचा प्रस्ताव मान्य केला. या पार्श्वभूमीवर मा. लोकेश चंद्र बोलत होते.

मा. लोकेश चंद्र म्हणाले की, महाराष्ट्र राज्याची आगामी काळातील विजेची गरज ध्यानात घेऊन महावितरणने २०३४ -३५ या आर्थिक वर्षापर्यंत पुरेशा विजेसाठीचे नियोजन केले आहे. आगामी पाच वर्षात राज्याची विजेची क्षमता ४५ हजार मेगावॅटने वाढविण्यासाठी वीजखरेदी करार केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने सौर, पवन, पंप स्टोरेज, बॅटरी स्टोरेज अशा नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांवर भर दिला आहे. या स्त्रोतांमधून वीज स्वस्त दरात मिळणार असल्याने कंपनीची आगामी पाच वर्षात वीजखरेदीची ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार आहे. त्याचा लाभ घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना वीजदर कपातीच्या स्वरुपात करून देण्यात आला आहे. यासाठी गेली अडीच वर्षे नियोजनबद्धरित्या काम सुरू होते.

त्यांनी सांगितले की, नवीकरणीय ऊर्जेवर भर दिल्यामुळे वीजखरेदीत बचत होण्यामध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या गेमचेंजर योजनेचा महत्त्वाचा वाटा आहे. शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी दिवसा वीज देण्यासाठीच्या या १६ हजार मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पातून सरासरी तीन रुपये प्रती युनिट इतक्या कमी दरात वीज उपलब्ध होणार आहे. अशा प्रकारच्या कल्पक उपायांमुळे महावितरणची वीजखरेदी खर्चात बचत होणार आहे.

मा. लोकेश चंद्र म्हणाले की, महावितरणने रिन्युएबल अर्थात नवीकरणीय ऊर्जेवर भर दिला आहे. त्याद्वारे मिळणाऱ्या विजेचे दर सौर ऊर्जेच्या बाबतीत आगामी २५ वर्षे तर पंप स्टोरेजच्या बाबतीत ४० वर्षे बदलणार नाहीत. स्वस्त व स्थिर दराची वीज मिळाल्यामुळे भविष्यकाळात पाच वर्षानंतर वीजदरात आणखी घट होऊ शकते. राज्यातील घरगुती, औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांचे वीजदर आगामी पाच वर्षात वाढणार नाहीत तर कमीच होत जातील.

स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंतच्या वीजवापरासाठी ८० पैसे प्रती युनिट जास्तीची सवलत देण्याचा आदेश आयोगाने दिला आहे. त्याबद्दल विचारले असता मा. लोकेश चंद्र म्हणाले की, ही सवलत कायम राहणार आहे. स्मार्ट मीटर हे ग्राहकांना अचूक वीजबिल उपलब्ध करून देण्यासाठी आणि ग्राहकांना त्यांचा वीजवापर नियमितपणे कळविण्यासाठी आहेत. तसेच राज्यात जेथे स्मार्ट मीटर लावले आहेत, तेथे वीजबिलाबद्दलच्या तक्रारी जवळ जवळ शून्यावर आल्या आहेत.

**उद्योगांसाठी महाराष्ट्रातील वीजदर स्पर्धात्मकच**

मा. लोकेश चंद्र यांनी सांगितले की, महाराष्ट्रात उद्योगांसाठीचे वीजदर इतर राज्यांपेक्षा जास्त आहेत, अशी तक्रार करण्यात येत असली तरी त्यात तथ्य नाही. राज्यात उद्योगांना वीजदराबाबत मिळणाऱ्या सवलतींचा विचार केला तर सध्याच हे दर स्पर्धात्मक आहेत. तसेच वीजदर कपातीचा निर्णय झाला आहे. आगामी पाच वर्षात राज्यातील उद्योगांचे वीजदर आणखी कमी होत जातील आणि ते गुजरात, तामिळनाडू अशा औद्योगिक मागणी जास्त असलेल्या राज्यांपेक्षा कमी होतील.

# ठाणे, पुणे, नागपूरच्या ग्राहकांना मिळणार पर्यायाचा हक्क

## महाराष्ट्र वीज नियामक आयोगाचा ऐतिहासिक निर्णय



**भिवंडी, दि. २७ : प्रतिनिधी**

ठाणे,पुणे,नागपूर, एमएमआर (MMR) मधील वीज ग्राहकांना आता पर्यायाचा हक्क मिळणार असल्याचा ऐतिहासिक निर्णय महाराष्ट्र वीज नियामक आयोग (MERC) ने घेतल्याची अधिकृत माहिती टोरंट पावर कंपनीने दिली आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र वीज नियामक आयोग (MERC) यांनी खाजगी कंपन्यांचे समांतर वीज वितरण परवाने (Parallel Licence) स्वीकारण्यास सुरुवात केली आहे.त्यामुळे ठाणे,मुंबई महानगर क्षेत्र (MMR), पुणे व नागपूर मधील वीज ग्राहकांना आता त्यांच्या वीजपुरवठादाराची निवड करण्याचा पर्याय उपलब्ध होणार आहे.दरम्यान राज्य सरकारच्या MSEDCL (महावितरण) कंपनीकडे आजवर एकाधिकार होता, पण आता अडानी इलेक्ट्रिसिटी व टोरेंट पॉवर यांसारख्या खाजगी कंपन्यांना देखील या भागांमध्ये वीजपुरवठा करण्याची संधी मिळणार आहे.त्यामुळे स्पर्धा निर्माण होऊन ग्राहकांना किफायतशीर दर, सुधारित सेवा व वेळेवर तक्रारींचे निवारण याचा लाभ मिळणार आहे. याकरिता महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडून १६ जुलै २०२५ पर्यंत नागरिकांकडून सूचना आणि हरकती मागवण्यात आल्या आहेत.तर २२ जुलै रोजी सार्वजनिक सुनावणीचे वेळापत्रक पुणे व नागपूरसाठी (टोरेंट पॉवर) व २३ जुलै रोजी ठाणे आणि एमएमआर क्षेत्रासाठी (अडानी व टोरेंट) असणार आहे. यामुळे ग्राहक त्यांच्या गरजेनुसार वीज कंपनीची निवड करू शकणार असून या स्पर्धेमुळे सेवा गुणवत्तेत सुधारणा, वेळेवर सेवा आणि उत्तम ग्राहक सहाय्य मिळेल. यामध्ये महाराष्ट्र वीज नियामक आयोगाचे दर नियमनात,परंतु या पर्यायामुळे कंपन्या आकर्षक दर व योजना देण्यासाठी एकमेकांशी स्पर्धा करतील.यासह खाजगी गुंतवणुकीला चालना मिळेल व वीज वितरण यंत्रणा अधिक सक्षम होईल. तर (एमइआरसी) चा हा निर्णय महाराष्ट्रातील वीज ग्राहकांसाठी एक मोठी आणि क्रांतिकारी पावले ठरणार असून, इतर राज्यांसाठी

# मनमाडहून कॅनडापर्यंत : संघर्षातून घडलेली रेचलची यशोगाथा

**मुंबई, दि. २७ : प्रतिनिधी**



मनमाडसारख्या छोट्या शहरात वाढलेल्या, पण मोठी स्वप्नं पाहणाऱ्या रेचल शांतवन निकाळजे हिने आपल्या जिद्द, मेहनत आणि सकारात्मक दृष्टिकोनाच्या जोरावर कॅनडामध्ये यशस्वी वाटचाल करत आपल्या कुटुंबाचेच नाही, तर संपूर्ण गावाचेही नाव उज्वल केले आहे.

कॅनडातील Conestoga College मधून Nursing Leadership and Healthcare Management हा अभ्यासक्रम पूर्ण करणे हे तिच्यासाठी सोपं नव्हतं. मध्यमवर्गीय कुटुंब, आर्थिक मर्यादा, आईच्या गंभीर आजारपणात शस्त्रक्रिया, दोन नोकऱ्या गमावण्याचा धक्का… या साऱ्या अडथळ्यांनी रेचलचा प्रवास खडतरच केला. पण तिच्या स्वप्नांच्या उंच झेपेला कोणताही अडथळा थांबवू शकला नाही.

“माझे वडील शाळेत जाऊ शकले नाहीत, पण त्यांनी मला शिकवले की, परिस्थिती कशीही असली तरी स्वप्नं पाहणं थांबवू नकोस. वडिलांनी मला पंख दिले, आणि त्या पंखांना बळ देण्याचं काम केलं माझ्या आईने,” असं रेचल सांगते, आणि तिच्या डोळ्यातून कृतज्ञतेचे अश्रू ओघळतात.

आर्थिक अडचणी, जबाबदाऱ्या, आईच्या आजारपणाचा काळ, शिक्षणाच्या खर्चासाठी धडपड… हे सगळं सांभाळत तिने कॅनडामध्ये शिक्षण पूर्ण केलं. तिने सिद्ध केलं की, “मनमाडसारख्या लहान गावातूनही मोठी स्वप्नं पाहता येतात, आणि ती सत्यातही उतरवता येतात.”

आज रेचलने तिच्या आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण केले आहे. तिच्या यशोगाथेने मुंबईसह महाराष्ट्रातील हजारो तरुणांना प्रेरणा मिळेल की, संकटं कितीही मोठी असली, तरी धैर्य, संयम आणि प्रामाणिक प्रयत्न हेच यशाचे खरे मंत्र आहेत.

**मनमाडच्या रेचलने दाखवून दिलंय –**

“स्वप्नं कुठून पाहिली याला अर्थ नसतो, ती पूर्ण करण्यासाठी किती झगडलं, हाच खरा अर्थ असतो.”

# वसईत विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज अभ्यासिका

- इंटरनेट, एसी, चार्जिंग प्वाईंट, 150 विद्यार्थ्यांना बसण्याची सुविधा
- माजी महापौर नारायण मानकर यांच्या पाठपुराव्याला यश

**वसई, दि. २७ : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी विविध प्रकारच्या अभ्यासासाठी वसई पश्चिम अंबाडी येथे अभ्यासिका केंद्र उभारण्यात आले आहे. मात्र, याठिकाणी अनेक सुविधांची वानवा विद्यार्थ्यांना सतावत होती. त्यामुळे बविआचे जेष्ठ नेते तथा माजी महापौर नारायण मानकर यांनी महापालिकेकडे विद्यार्थ्यांना सुविधा द्या, अशी मागणी केली होती. त्या.च्या पाठपुराव्याला यश आले असून, अभ्यासिका केंद्रात आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या निर्देशानुसार नव्या सुविधा उभारण्यात आल्या आहेत.

माजी महापौर नारायण मानकर यांनी अभ्यासिकेत असलेल्या समस्यांबाबत महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार याना १ डिसेंबर व त्यानंतर दोनवेळा तसेच विद्यार्थ्यांनी १२ मार्च रोजी पत्रव्यवहार करत योग्य त्या सुविधा मिळाव्यात अशी मागणी केली होती. त्याची त्वरित दखल घेत आयुक्त अनिलकुमार पवार यांनी संबंधितांना निर्देश दिले होते.




आयुक्त पवार यांच्या निर्देशानुसार शहर अभियंता प्रदिप पाचंगे , कार्यकारी अभियंता, प्रकाश साटम, विद्युत विभाग अभियंता अमोल जाधव आदींनी अभ्यासिकेतील समस्यांची पाहणी केली. त्यानंतर विद्यार्थ्यांना वाय- फाय व इंटरनेटची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच प्रसाधनगृह दुरुस्ती , अभ्यासिकेत मुलां-मुलींसाठी एकूण २० चार्जिंग पॉईंट, मुलामुलीसाठी स्वतंत्र १२ एयरकंडीशनरची व्यवस्था याठिकाणी करण्यात आली आहे. १५० विद्यार्थ्यांना बसण्यासाठी देखील सुविधा मिळणार असून सध्या फर्निचर तयार करण्याचे काम सुरु आहे.

वसई विरार महापालिकेच्या अभ्यासिकेत UPSC, MPSC, Engineering, CA, LAW, NEET, JEE, MBBS, SET, NET, LLM अशा विविध प्रकारच्या अभ्यासक्रमासाठी ३५० ते ४०० विद्यार्थी दैनंदिन येत असतात. यापैकी अनेक विद्यार्थी वरील अभ्यासक्रमात यशस्वी झालेले आहेत. त्यांचा सत्कारदेखील झालेला असून, त्यामुळे महापालिकेच्या लौकीकात भर पडली आहे. विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्या महापालिकेने निकाली काढल्याने विद्यार्थी वर्गाला अभ्यास करताना सोईचे होणार आलस्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे. वसई विरार शहर महापालिकेने समस्या सोडवून दिलेल्या सुविधांबद्दल आभार व येणाऱ्या विद्यार्थ्यांना अशाच सुविधा अविरतपणे मिळाव्यात, अशी अपेक्षा प्रशासनाकडून असल्याचे माजी महापौर नारायण मानकर यांनी सांगितले.

# रेशन अनियमिततेविरोधात महिलांचा एल्गार परवाना रद्द करण्याची मागणी

**डहाणू, दि. २७ : प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील कोसबाड येथील स्वस्त धान्य दुकानातील अनियमितता आणि नागरिकांना होणाऱ्या त्रासाच्या विरोधात शेकडो महिलांनी एकत्र येत एल्गार पुकारला. जिल्हा पुरवठा अधिकारी महल्ले यांची भेट घेऊन संबंधित दुकानदाराचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली.

गोरगरीब व कष्टकरी जनतेसाठी असलेल्या स्वस्त धान्य योजनेचा लाभ कोसबाड परिसरातील नागरिकांना मिळावा, यासाठी महिलांनी आवाज उठवला. या योजनेअंतर्गत कोसबाड येथील रेशन वाटप करणारा दुकानदार याच्यावर गेल्या




वर्षीपासूनच महिलांशी गैरवर्तन, दारूच्या नशेत असभ्य भाषा वापरणे, रेशनचा तांदूळ काळ्या बाजारात विकणे, गोण्यांमधून तांदूळ काढून भाताचा पेंडा भरून ठेवण्याचे गंभीर आरोप झाले होते. त्यावेळी तात्पुरती कारवाई करत त्याचा परवाना निलंबित करण्यात आला होता.

मात्र, अलिकडच्या काळात स्थानिक पुरवठा अधिकाऱ्यांशी संगनमत करून त्याने पुन्हा दुकान सुरू केल्याचे समोर आले आहे. याप्रकारामुळे नागरिकांमध्ये पुन्हा असंतोष निर्माण झाला असून, महिलांनी थेट जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांशी भेट घेत वस्तुस्थिती मांडून लेखी तक्रार करण्यात आली. अधिकाऱ्यांनी दोन दिवसांत संबंधित दुकानदाराचे रेशन विक्रीचे अधिकार काढून घेण्याचे आश्वासन दिले. यावेळी आमदार विनोद निकोलेंनी स्वतः उपस्थित राहून महिलांच्या मागणीस पाठिंबा दिला. कोसबाडमधील जनतेला या त्रासातून मुक्त करण्यासाठी आणि एक प्रामाणिक दुकानदार नियुक्त करण्यासाठी मी स्वतः पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी किसान सभेचे कार्याध्यक्ष व ठाणे-पालघर अध्यक्ष चंद्रकांत घोरखाना, महिला नेते निलीमा माळी, रूपा राठोड, दिपक कोद्या, अमिता दळवी, अर्चना कोद्या यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या. यामुळे शासन दरबारी या तक्रारीकडे गांभीर्याने पाहिले जात असून, पुढील काही दिवसांत अधिकृत आदेश अपेक्षित आहेत. ग्रामस्थांनी एकमुखाने दुकान कायमस्वरूपी रद्द करण्याची आणि त्याऐवजी नवा, स्वच्छ प्रतिमेचा दुकानदार नेमण्याची मागणी लावून धरली आहे.

# अंबरनाथ शिवमंदिर परिसरात सुरू असलेल्या अवैध उत्खनन आणि बांधकाम, शिवमंदिर उद्ध्वस्त होण्याचा धोका

**अंबरनाथ, दि. २७ : प्रतिनिधी**



अंबरनाथ येथील शिवमंदिर परिसरात सुरु असलेल्या अवैध उत्खनन व बांधकामामुळे शिवमंदित उध्वस्त होण्याचा धोका निर्माण झाला असुन शिवमंदिरासोबतच वालधुनी नदीच्या तटीय परिसरातही प्राचीन वृक्षांचे अपरिमित नुकसान झाले आहे .तर शिवमंदिराच्या सुरक्षा भिंतीला लागून बांधकाम करणाऱ्यावर ए एस आय द्वारे एफआयआर दाखल झाले असताना शासन प्रशासन आणि लोकप्रतिनिधींवर एफआयआर का दाखल केले नाही असा प्रश्न हिराली फाऊंडेशनच्या अध्यक्षा ॲड . सरिता खानचंदानी यांनी उपस्थित केला आहे .

येथील शिवमंदिरात होणारे पूजापाठ, आरती आणि दक्षिणाग्रहणाची परवानगी पुरातन विभाग धर्मादाय आयोगाकडून घेतली गेली नसुन त्या ठिकाणी सुरू असलेले पूजापाठ, आरती आणि दानपेट्यांमधील दक्षिणेचा चढावा कोणाच्या खिशात जात आहे असा प्रश्न निर्माण झाला आहे . या मंदिराची कोणती ही डागडुजी होत नसुन हे मंदिर पडण्याच्या मार्गावर असताना आसपास च्या परिसरात करोडो रुपये का खर्च करण्यात येत असल्याचा आरोप ही ॲड . खानचंदानी यांनी केला आहे . महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथमध्ये शिव मंदिर, प्राचीन स्मारक आणि पुरातत्व स्थळ आणि अवशेष (एएमएएसआर) अधिनियम - प्राचीन स्मारक आणि पुरातत्व स्थळ अवशेष अधिनियम अंतर्गत एक संरक्षित स्मारक आहे, जे १,००० वर्षांपेक्षाही जास्त जुने आहे आणि महाराष्ट्राच्या स्थापत्य वारसाचे प्रतीक आहे. हिराली फाउंडेशनच्या अध्यक्षा, याचिकाकर्त्या ॲड . सरिता खानचंदानी यांनी आरोप करताना म्हटले आहे की, मंदिर परिसराच्या ५ ते १० मीटरच्या आत अवैध उत्खनन आणि बांधकाम सुरू आहे, जे कायद्याने निषिद्ध असलेल्या ३०० मीटरच्या बफर झोनच्या खूप आत आहे. जे पुरातत्व विभाग, आर्कियोलॉजीकल सर्वे ऑफ इंडिया दिल्लीचे संचालक, ठाणे पोलीस आयुक्त, एसडीओ उल्हासनगर, तहसीलदार अंबरनाथ, एमपीसीबी प्रादेशिक अधिकारी (कल्याण) आणि पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांसह अंबरनाथ नगरपालिकेच्या उच्च अधिकाऱ्यांना निवेदन पाठवुन यांचे या विषयावर लक्ष वेधुन ॲड. सरिता खानचंदानी यांनी त्वरित हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

# आणीबाणी काळातील छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन

## पालघर जिल्ह्यातील वीरांनी आणि वीरांगनानी लोकशाही स्वातंत्र्याची दुसरी लढाई आणीबाणी काळात लढली-खासदार डॉ. हेमंत सवरा

**पालघर, दि. २७ : प्रतिनिधी**

पहिली स्वातंत्र्याची लढाई ब्रिटिश साम्राज्य विरुद्ध लढून आपल्याला स्वातंत्र्य प्राप्त झाले. त्यानंतर संपूर्ण देशात लोकशाही मजबूत होत असताना 25 जून 1975 रोजी संविधानाची हत्या करून आणीबाणी लागू केली या आणीबाणीच्या विरोधात पालघर जिल्ह्यातील वीरांनी आणि वीरांगनानी लोकशाही स्वातंत्र्याची दुसरी लढाई लढली असल्याचे प्रतिपादन खासदार डॉ.हेमंत सवरा यांनी केले. आणीबाणी लागू होऊन 50 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल संविधान हत्या दिवस 2025 चे आयोजन जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.इंदू राणी जाखड , निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, उपजिल्हाधिकारी महेश सागर पालघर तहसीलदार रमेश शेंडगे, तहसीलदार सचिन भालेराव, आणीबाणी विरोधी लढा देणारे पालघर जिल्ह्यातील वीर योद्धे तसेच नागरिक उपस्थित होते.

राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकशाही स्वातंत्र्याची दुसरी लढाई लढणाऱ्या वीरांचा तसेच त्यांच्या वारसदारांचा सन्मान करण्यासाठी 2014 मध्ये स्तुत्य निर्णय घेतला होता. हा निर्णय 2019. पर्यंत चालू होता कालांतराने 2019 मध्ये तो बंद करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तो निर्णय पुन्हा घेतल्यामुळे खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. आणीबाणी का लागू केली गेली हा संशोधनाचा विषय राहिलेला नाही हुकूमशाही देशात परत आणण्यासाठी आणीबाणी लागू करण्यात आली. यापूर्वी देशाने मुघल आणि इंग्रज राजवटीची हुकूमशाही पाहिली होती स्वातंत्र्यानंतर

25 जून 1975 रोजी देशाने पुन्हा हुकूमशाही अनुभवली साधारणपणे 21 महिने जोपर्यंत आणीबाणी काढली गेली नाही तोपर्यंत ती पूर्ण देशाने अनुभवली होती . या आणीबाणी काळामध्ये अनेक जणांना तुरुंगवास भोगाव लागला किशोरवयीन मुलांचाही समावेश होता संपूर्ण देशाला कारागृहामध्ये परावर्तित करण्याचे काम आणीबाणी काळात करण्यात आले. तसेच नागरिकावर अनेक जाचक निर्बंध लादण्यात आले. सरकार यंत्रणाचा गैरवापर करण्यात आला कुणीही सरकारच्या विरोधात बोलायचं नाही ,लिहायचं नाही प्रत्येकावर बंदी जो बोलेल त्याला तुरुंगवास अशा प्रकारचे चित्र संपूर्ण भारत देशात पहायला



मिळत असल्याचे खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी सांगितले. तत्कालीन पंतप्रधान यांनी 1971 ची निवडणूक लढवली आणि जिंकल्या त्यांच्याविरुद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली की ही निवडणूक लोकशाहीला धरून लढलेली नसून पैशांचा वापर करून तसेच सरकारी यंत्रणांचा गैरवापर करून जिंकण्यात आली आहे.

त्यामुळे त्यांची निवडणूक रद्दबदल करावी त्यांचं पद रद्द कराव अशी याचिका दाखल केली 12 जून 1975 ला उच्च न्यायालयाने निकाल दिला तत्कालीन पंतप्रधान यांना सांगितलं की तुमचा पदावर राहण्याचा संविधानिक अधिकार राहिलेला नाही पदावरून खाली व्हावे या विरोधात त्यांनी सर्वोच्च न्यायालयातयाचिका दाखल केली आणि 24 जून 1975 रोजी सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा तो निर्णय अबाधित ठेवला . त्यानंतर तात्कालीन केंद्र सरकारने राष्ट्रपती मार्फत 25 जून 1975 रोजी संपूर्ण देशामध्ये आणीबाणीची घोषणा केलीआणीबाणी काळात देशातील महत्त्वाच्या लोकशाही मार्गाने चालणाऱ्या संघटनावर बंदी घालण्यात आली विद्यार्थी, शेतकरी, कष्टकरी, तसेच उद्योगपतीनाहि तुरुंगवास भोगावे लागला असल्याचे खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी सांगितले. लोकशाही वाचवण्यासाठी आंदोलन करणाऱ्या वीरांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेऊन त्यांना मानधन सुरू केले आज आपण सर्वांना सन्मानपत्र सुद्धा दिले . आंदोलनामध्ये भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांची काय समस्या असेल तरी ती लवकरात लवकर सोडविली जाईल असा विश्वासही खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी व्यक्त केला.

लोकशाही भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक असून नागरिकांचे मूलभूत अधिकार 25 जून 1975 रोजी कमी करण्यात आले या घटनेला 25 जून रोजी 50 वर्षे पूर्ण झाल्यामुळे केंद्र आणि राज्य सरकार यांच्या निर्देशानुसार लोकशाही वाचवण्यासाठी सहभाग नोंदवलेल्या व्यक्तींचा सन्मान आणि गौरव करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे . लोकशाही बळकट करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे . सन्माननिधी बाबत काही समस्या असल्यास त्या लवकरात लवकर जिल्हा प्रशासनामार्फत सोडविण्यासाठी प्रयत्न करू असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी व्यक्त केला. यावेळी आणीबाणी काळामध्ये तुरुंगवास भोगलेल्या स्वातंत्र्य सैनिकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

आणीबाणी कालावधीमधील संकलित करण्यात आलेल्या छायाचित्राच्या प्रदर्शनाचे उद्घाटन खासदार डॉ. हेमंत सवरा आणि जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या हस्ते करण्यात आले. छायाचित्राचे प्रदर्शन जिल्हा ग्रंथालय यांचे कार्यालय प्रशासकीय इमारत– अ, पहिला मजला, कक्ष क्रमांक 106 येथे आयोजित करण्यात आले. हे प्रदर्शन नागरिकांसाठी एक महिना खुले राहणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी आणीबाणी कालावधीतील छायाचित्र प्रदर्शनास भेट द्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांनी केले. जिल्ह्यातील सर्व चित्रपटगृहांमध्ये आणीबाणी कालावधी मधील लघु चित्रफितीचे प्रसारण करण्यात येणार आहे.

